महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये आयुक्त यांच्याकडील आदेश क्र. वविशम/लेखा/७७/२०२५ दि. ०४/०८/२०२५ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाज सोयीच्या दृष्टीने उपायुक्त व अति. आयुक्त यांना अधिकार प्रदान केले आहेत. सदर कामाकरिता नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास **संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी** MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रीक व नैसर्गिक व इतर सबक कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक राहील. वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९५ मध्ये कौलसिटी आणि चुळणा खलाटीपाडा येथील शौचालय दुरुस्ती करणे या कामास आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र.८७६ दिनांक २६/०६/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया पाहता मे. एस.एस. एन्टरप्रायझेस हयांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुर करण्यात येत असुन लघुत्तम निविदा धारकांसोबत संविदा करणे २% सुरक्षा अनामत भरणे तसेच करारनामा कार्यादेश देणेकरिता महानगरपालिका अधिनियम ७३ (ड) अन्वये मान्यता देत आहे. तसेच Estimate मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geotagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तद्नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

(अजित मुठे)
उपायुक्त, परिमंडळ 3
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (प) जि. पालघर, पिन न. ४०१३०३
दुरध्वनी क्र. ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

निविदा दर मंजूरी ठराव क्र.:- १८२५

विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक : १२/१२/२०२५

विभागः- बांधकाम विभाग
कामाचे नांव :- वॉर्ड क्र. ९५ मध्ये भाबोळा आदिवासी पाडा टॉयलेट क्र. १ व २ येथील शौचालय दुरुस्ती करणे
योजनेचे नाव :-
लेखशिर्षक:- प्रभाग समिती स्तरावरील विकास कामासाठी राखीव तरतुद
अंदाजपत्रकीय रक्कम :२,९७,३९५/- तांत्रिक मान्यता रक्कम :- २,९७,३९५/- निविदा रक्कम :- २,९७,३९५/-
प्रशासकीय मान्यता आदेश/ठराव क्र.:- ९०४ दिनांक. ०२/७/२०२५ तांत्रिक मान्यता क्र.:- ७/४० दिनांक ०३/०७/२०२५
ई विशेष सूचना प्रसिध्दी दिनांक :-११/११/२०२५ वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक :- १४/११/२०२५
कालावधी ६० दिवस वृत्तपत्रांची नावे :- १. दै. आमची मुंबई २. दै. वृत्तमानस ३. दै. सँड पोस्ट
ई निविदा प्रसिध्दी :-दि. १७/११/२०२५ वेळ दु. ३.०० पासून ते दि. २४/११/२०२५ वेळ २.००.पर्यंत
ई निविदाद्वारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या :- ०४
प्रथम लिफाफा उघडल्याची दिनांक :- ०४
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी (ज्यांच्या डीएससी ने निविदा उघडल्या त्यांची नावे नमूद करावीत):-उप अभियंता, प्र.लेखापाल, सहा आयुक्त, मुख्य लेखा परिक्षक, उप आयुक्त परिमंडळ -३.

प्राप्त दर

अ क्र	निविदाकार	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास पर फॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	एल १, एल२, एल ३ इत्यादी नुसार क्रम निश्चित करून नोंदवावा	एल १ चा तपशिल
१	मे. बालाजी एन्टरप्रायझेस	अंदाजपत्रकीय दराने		एल १	
२	मे. आर.व्ही.धोत्रे. कंस्ट्रक्शन	२.२५ जास्त दराने		एल २	
३	मे. एस.एस. एन्टरप्रायझेस	३.०० जास्त दराने		एल ३	
४	मे. मंताशा एन्टरप्रायझेस	४.५० जास्त दराने		एल ४	

उपरोक्त निविदाकार यांनी सादर केलेल्या दराचा विचार करता सर्वात कमी दर (एल१) मे. बालाजी एन्टरप्रायझेस निविदाकार ठरत असून त्यांनी अंदाजपत्रकीय हे दर नमूद केलेले आहेत.

कामाबाबतचे बाबनिहाय वेळापत्रक

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	०२/०७/२०२५
२	निविदा प्रसिध्द करणे	११/११/२०२५
३	प्रथम लिफाफा उघडणे	२६/११/२०२५
४	द्वितीय लिफाफा उघडणे	२७/११/२०२५
५	संविदा मंजूरी ठराव	१०/१२/२०२५
६	कार्यादेश देणे / करारनामा करणे	१८/१२/२०२५
७	काम सुरु करणे	१९/१२/२०२५
८	काम पूर्ण करणे	०६/०२/२०२६
९	देयक सादर करणे	१२/०२/२०२६
१०	देयकाचे प्रदान करणे	१६/०२/२०२६
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	२३/०२/२०२६

तरी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच मधील वॉर्ड क्र. ८५ मध्ये ओमनगर येथे गोल्डन बाग बिल्डींग ते वसई वन बिल्डींग जवळील फुटपाथवर स्लॅब दुरुस्ती करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३क/७३ड अन्वये लघुत्तम निविदाधारक मे. निकसन हयांचे सोबत संविदा करणे, २% सुरक्षा अनामत भरणे, करारनामा व कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस सादर.

ठराव निर्णय :-

सदर काम खालील नमुद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	०२/०७/२०२५
२	निविदा प्रसिध्द करणे	११/११/२०२५
३	प्रथम लिफाफा उघडणे	२६/११/२०२५
४	द्वितीय लिफाफा उघडणे	२७/११/२०२५
५	संविदा मंजूरी ठराव	१०/१२/२०२५
६	कार्यादेश देणे / करारनामा करणे	१८/१२/२०२५
७	काम सुरु करणे	१९/१२/२०२५
८	काम पूर्ण करणे	०६/०२/२०२६
९	देयक सादर करणे	१२/०२/२०२६
१०	देयकाचे प्रदान करणे	१६/०२/२०२६
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	२३/०२/२०२६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये आयुक्त यांच्याकडील आदेश क्र. वविशम/लेखा/७७/२०२५ दि. ०४/०८/२०२५ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाज सोयीच्या दृष्टीने उपायुक्त व अति. आयुक्त यांना अधिकार प्रदान केले आहेत. सदर कामाकरिता नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रीक व नैसर्गिक व इतर सबक कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक राहील. वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९५ मध्ये भाबोळा आदिवासी पाडा टॉयलेट क्र. १ व २ येथील शौचालय दुरुस्ती करणे या कामास आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र.९०४ दिनांक ०२/०७/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया पाहता मे. बालाजी एन्टरप्रायझेस हयांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुर करण्यात येत असुन लघुत्तम निविदा धारकांसोबत संविदा करणे २% सुरक्षा अनामत भरणे तसेच करारनामा कार्यादेश देणेकरिता महानगरपालिका अधिनियम ७३ (ड) अन्वये मान्यता देत आहे. तसेच Estimate मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geotagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तद्नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

(अजित मुठे)
उपायुक्त, परिमंडळ 3
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर पिन. नं ४०१ ३०३.
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaiviraracorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १९२६ **दिनांक:-** २१/१२/२०२५

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "सी" चंदनसार हद्दीतील तलाव दरपत्रक मंजुरीबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "सी" चंदनसार अंतर्गत **सन २०२५ ते २०२८ (कार्यादेश दिनांकापासून पुढील तीन वर्षे)** या कालावधीकरीता दहीसर मोठा तलाव, दहीसर तलोठी तलाव, शिरगाव मोठा तलाव, शिरगाव लहान तलाव, कोपरी तलाव या तलावाचे लिलाव करणेकामी महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहुन जाहिर दरपत्रक सुचना मागविणेकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक यांची ठराव क्रमांक **१५०९ दि.३१/१०/२०२५** नुसार मंजुरी घेण्यात आलेली आहे. त्यानुसार मागविण्यात आलेल्या दरपत्रकांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	दरपत्रकाचा तपशिल	तलावाचे नाव	दिनांक	दरपत्रक प्राप्त/अप्राप्त
१.	दरपत्रक	दहीसर मोठा तलाव	दि.११/११/२०२५ ते दि.१९/११/२०२५	दरपत्रक प्राप्त झाले आहेत.
२.	दरपत्रक	शिरगाव मोठा तलाव	दि.११/११/२०२५ ते दि.१९/११/२०२५	दरपत्रक प्राप्त झाले आहेत.
३.	दरपत्रक	कोपरी तलाव	दि.११/११/२०२५ ते दि.१९/११/२०२५	दरपत्रक प्राप्त झाले आहेत.
४.	दरपत्रक प्रथम मुदत वाढ	दहीसर तलोठी तलाव	दि.२०/११/२०२५ ते दि.२८/११/२०२५	दरपत्रक प्राप्त झाले आहेत.
५.	दरपत्रक प्रथम मुदत वाढ	शिरगाव लहान तलाव	दि.२०/११/२०२५ ते दि.२८/११/२०२५	दरपत्रक प्राप्त झाले आहेत.

१)दहीसर मोठा तलाव

अपेक्षित रक्कम -३६,८९७/-

अ.क्र.	नाव	दरपत्रकातील दर
१.	आदेश सुनिल पवार	३७,९९८/-
२.	विकास गोविंद किणी	४०,४०४/-
३.	सुमित सुरेश किणी	३९,६९७/-

जास्त दराचे दरपत्रक धारक :- विकास गोविंद किणी
रक्कम :- ४०,४०४/-

२) शिरगाव मोठा तलाव

अपेक्षित रक्कम -२,४८,५६३/-

अ.क्र.	नाव	दरपत्रकातील दर
१.	दक्ष म. भोईर	२,८०,०००/-
२.	बेबीबाई भोईर	२,५५,०००/-
३.	कल्पेश मधुकर पाटील	५,००,०००/-
४.	शांताराम राजाराम मलेकर	३,००,०००/-
५.	विलास राजाराम पाटील	३,५०,०००/-
६.	संदेश अमृत पाटील	२,५०,०००/-
७.	चेतन गणेश भोईर	५,२५,०००/-

जास्त दराचे दरपत्रक धारक :- चेतन गणेश भोईर
रक्कम :- ५,२५,०००/-

३) कोपरी तलाव

अपेक्षित रक्कम -५९,८७५/-

अ.क्र.	नाव	दरपत्रकातील दर
१.	राजेश नामदेव ओगे	६०,३००/-
२.	मनोज दत्ता पाटील	६०,०००/-
३.	रोहीदास भालचंद्र पाटील	६०,१००/-

जास्त दराचे दरपत्रक धारक :- राजेश नामदेव ओगे
रक्कम :- ६०,३००/-

४)दहीसर तलोठी तलाव

अपेक्षित रक्कम -२३,४१७/-

अ.क्र.	नाव	दरपत्रकातील दर
१.	अस्मिता गणेश पाटील	२४,०००/-
२.	भुषण जगन पाटील	२४,५००/-
३.	किसन जगन पाटील	२५,०००/-

जास्त दराचे दरपत्रक धारक :- किसन जगन पाटील
रक्कम :- २५,०००/-

५) शिरगाव लहान तलाव

अपेक्षित रक्कम -३९,५४८/-

अ.क्र.	नाव	दरपत्रकातील दर
१.	कमलाकर बारक्या पाटील	४१,२००/-
२.	यशवंत हिरा पाटील	४१,०००/-
३.	अमित कमलाकर पाटील	४१,०५०/-

जास्त दराचे दरपत्रक धारक :- श्री. कमलाकर बारक्या पाटील
रक्कम :- ४१,२००/-

वरील तलावांसाठी प्राप्त झालेले श्री. विकास गोविंद किणी, श्री. चेतन गणेश भोईर, श्री. राजेश नामदेव ओगे, श्री. किसन जगन पाटील, श्री. कमलाकर बारक्या पाटील यांचे जास्तदराचे दरपत्रक मंजुर करण्यात येऊन संबंधिताकडून **सन २०२५ ते २०२८ (कार्यादेश दिनांकापासून पुढील तीन वर्षे)** या कालावधीकरीता तलाव लिलावाच्या रक्कमेसह वसुल करणे कामी त्यांच्या समवेत करारनामा करून कार्यादेश देण्यासाठी प्रशासकीय मंजूरीकरीता सादर.

निर्णयः- वरिल प्रस्तावानुसार प्रभाग समिती "सी" चंदनसार अंतर्गत उपरोक्त सन २०२५ ते सन २०२८ (कार्यादेश दिनांकापासून पुढील तीन वर्षाकरीता) १)दहीसर मोठा तलाव- श्री. विकास गोविंद किणी रु. ४०,४०४/-,२)शिरगाव मोठा तलाव- श्री. चेतन गणेश भोईर रु. ५,२५,०००/-, ३) कोपरी तलाव - श्री. राजेश नामदेव ओगे रु.६०,३००/- ४)दहीसर तलोठी तलाव- श्री. किसन जगन पाटील रु.२५०००/-, ५) शिरगाव लहान तलाव- श्री. कमलाकर बारक्या पाटील रु. ४१,२००/- या तलावासाठी प्राप्त झालेले जास्तदराचे दरपत्रक मंजुर करण्यात येऊन संबंधिताकडून तलाव लिलावाची रक्कमेवर वसुल करणे कामी संविदा करणेस तसेच करारनामा करून कार्यादेश देण्यासाठी प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेत येत आहे.

(स्वाती देशपांडे)
उप आयुक्त (तलाव विभाग)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प), जि-पालघर, पिन नं. ४०१३०३
दुरध्वनी - ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५० - २५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १९२७ विभाग :- परवाना
दिनांक :- १२ /१२/२०२५

प्रस्तावाचा विषय :- **महानगरपालिकेची मैदाने, कला-क्रिडा समारंभासाठी व धार्मिक कार्यासाठी, निवडणूकीच्या कामासाठी, वैयक्तीक मालकीच्या जागा, जत्रा उत्सव व विविध समारंभासाठी भाडे तत्वावर देणेबाबत तसेच व्यवसाय परवाना, ना-हरकत दाखला, नूतनीकरण फी, साठा परवाना, नवीन दर निश्चीत करणेबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयांन्वये सादर करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, कार्यक्षेत्रात खेळाच्या मैदानांचे आरक्षीत भुखंड असून काही भुखंड विकसित झालेले आहेत. नोंदणीकृत संस्था व शाळा तसेच महाविद्यालये आणि नागरीकांचे येणारे अर्जानुसार कला क्रिडा सभारंभासाठी व धार्मिक कार्यासाठी प्रभाग समिती स्थरावर सहा.आयुक्त यांच्या परवानगीने मनपाची मैदाने भाडे तत्वावर देण्यात येतात. परंतू, प्रभाग समिती स्थरांवर देण्यात येणाऱ्या मैदानाच्या भाडेबाबत तफावत दिसून येत आहे. तरी, खालील नमूद यादीतील मनपाची एकूण २० मैदाने आहेत.

प्रभाग समिती निहाय महापालिका मैदानांची नावे खालील तपशीलात नमूद करण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रभाग समिती		महपालिका मैदानाची नावे
१)	अे	१	विराट नगर मैदान
		२	गोकूळ टाऊनशिप मैदान
		३	पुरापाडा मैदान
		४	महाडा स्पोर्टस कॉम्पलेक्स मैदान
२)	बी		मनवेल पाडा मैदान
३)	सी		जिवदानी देवी मैदान
४)	डी		वसंत नगरी मैदान
५)	ई	१	कला क्रिडा मैदान क्र. १, नालासोपारा पोलीस स्टेशनच्या मागे
		२	कला क्रिडा मैदान क्र. २, नालासोपारा पोलीस स्टेशनच्या मागे
		३	शुर्पारक मैदान
		४	झालावड गार्डन मैदान
		५	रायन इंटरनॅशनल स्कूल जवळ, सर्व्हे क्र. १०९ मैदान
		६	सनशाईन पोलीस चौकी जवळील मैदान
		७	गुलमोहर सोसायटी समोरील मैदान

		८	मिट टाऊन मैदान
६)	जी		अप्पा मैदान
७)	एच	१	साईनगर मैदान
		२	विशाल नगर मैदान
		३	चुळणे मैदान
८)	आय		नरवीर चिमाजी अप्पा मैदान

त्याप्रमाणे, लगतच्या मनपाचा विचार केला असता मीरा भाईदर शहर महानगरपालिका व कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे शाळेय कला-क्रिडासाठी प्रतिदिन १,५००/- रू. इतर संस्थामार्फत आयोजीत क्रिडा स्पर्धासाठी प्रतिदिन ५,०००/- रू. तसेच धार्मिक कार्यक्रमासाठी प्रतिदिन ५,०००/- रू. शुल्क आकारले जाते व आपल्या महानगरपालिकेत प्रभाग समिती स्तरावर शाळेय, धार्मिक कार्यक्रमासाठी प्रतिदिन २,५००/- रू. व इतर समारंभासाठी प्रतिदिन ५,०००/- रू. शुल्क आकारणी केली जाते.

त्याअनुषंगाने, वरील प्रतिदिन दराचा इतर महानगरपालिकेचा विचार केला असता मनपाच्या प्रचलित नियमानुसार भाडेवाढ करणे आवश्यक आहे. तरी, प्रशासकीय ठराव क्र. ३४२, दि.०८/०१/२०२१ च्या ठरावानुसार परवाना फी मध्ये दरवाढ झाली नसल्याने मागील ३ वर्षात फी दरवाढ झालेली नाही, तरी सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ वार्षिक १०% प्रमाण दरवाढ करणे उचित राहील. तसेच प्रशासकीय ठराव क्र. १०७, दि.१६/०४/२०२५ च्या ठरावानुसार महानगरपालिकेची मैदाने, नोंदणीकृत संस्था व शाळा तसेच महाविद्यालये आणि नागरीकांचे येणारे अर्जानुसार कला क्रिडा सभारंभासाठी व धार्मिक कार्याक्रमासाठी राखीव ठेवणेत आलेली आहेत.

तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेत वैयक्तीक मालकीच्या मोकळ्या जागेमध्ये जत्रा मेळावे, यात्रा उत्सव आयोजनाकरीता तात्पुरत्या स्वरूपामध्ये मा.उप-आयुक्त, परवाना विभाग, मुख्यालय याच्यामार्फत परवानगी दिली जाते. प्रशासकीय ठराव क्र. ३४२, दि.०८/०१/२०२१ च्या अनुषंगाने, तात्पुरत्या स्वरूपाच्या कालावधीकरीता फी प्रस्तावित दर निश्चीत केलेले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

तक्ता क्र. १

तात्पुरत्या स्वरूपाच्या कालावधीकरीता सध्याचे प्रचलित दर

अ.क्र.	कालावधी	क्षेत्रफळ (चौ.फुट)	दर (रू. मध्ये)
१)	०१ ते ०७ दिवस	२५० चौ.फुट पर्यंत	१,०००/-
२)		२५० चौ.फुटाच्या पुढे	२,०००/-
३)	०८ ते १५ दिवस	२५० चौ.फुट पर्यंत	२,०००/-
४)		२५० चौ.फुटाच्या पुढे	३,०००/-
५)	१६ ते ३० दिवस	२५० चौ.फुट पर्यंत	३,०००/-
६)		२५० चौ.फुटाच्या पुढे	४,०००/-
७)	३१ ते ६० दिवस	२५० चौ.फुट पर्यंत	५,०००/-
८)		२५० चौ.फुटाच्या पुढे	७,५००/-
९)	६१ ते ९० दिवस	२५० चौ.फुट पर्यंत	१०,०००/-
१०)		२५० चौ.फुटाच्या पुढे	१५,०००/-

तक्ता क्र. ०२

खाजगी मालकी जागेत मागील ३ वर्षाच्या कालावधीतील प्रति वर्ष १०% प्रमाणे प्रस्तावित दर

अ. क्र.	कालावधी	क्षेत्रफळ (चौ.फुट)	दर (रू. मध्ये)	क्षेत्रफळ (चौ.फुट)	दर (रू. मध्ये)	क्षेत्रफळ (चौ.फुट)	दर (रू. मध्ये)	क्षेत्रफळ (चौ.फुट)	दर (रू. मध्ये)	क्षेत्रफळ (चौ.फुट)	दर (रू. मध्ये)
१)	०१ ते ०७ दिवस	२५० चौ.फुट पर्यंत	१,७००/-	२५० चौ.फुट ते १००० चौ.फुट पर्यंत	३,४००/-	१००० चौ.फुट ते ५००० चौ.फुट पर्यंत	५,१००/-	५००० चौ.फुट ते १०००० चौ.फुट पर्यंत	६,८००/-	१०००० चौ.फुट ते २०००० चौ.फुट च्या पुढे	८,५००/-
२)	०८ ते १५ दिवस		३,४००/-		५,१००/-		६,८००/-		८,५००/-		१०,२००/-
३)	१६ ते ३० दिवस		५,१००/-		६,८००/-		८,५००/-		१०,२००/-		११,९००/-
४)	३१ ते ६० दिवस		६,८००/-		८,५००/-		१०,२००/-		११,९००/-		१३,६००/-
५)	६१ ते ९० दिवस		८,५००/-		१०,२००/-		११,९००/-		१३,६००/-		१५,३००/-

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्वमालकीचे प्रभाग समिती स्तरावर एकूण २० मैदाने असून सदरची मैदाने शालेय कला-क्रिडा इतर नोंदणीकृत संस्थेच्या कला-क्रिडा तसेच धार्मिक व निवडणूकी कामी भाडेतत्वावर देणेबाबत दर निश्चित केलेले आहेत त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	प्रतिदिन	क्षेत्रफळ	शालेय कला क्रिडा व धार्मिक कार्यक्रम	नोंदणीकृत संस्था शाळा व्यतिरिक्त कला-क्रिडा	निवडणूक कामी
१)	१	२५० चौ.फुट पर्यंत	१,७००/-	२,०००/-	४,०००/-
२)	१	२५० चौ.फुट ते १००० चौ.फुट पर्यंत	२,०००/-	३,५००/-	६,०००/-
३)	१	१००० चौ.फुट ते ५००० चौ.फुट पर्यंत	२,५००/-	४,५००/-	८,०००/-
४)	१	५००० चौ.फुट ते १०००० चौ.फुट पर्यंत	३,०००/-	५,५००/-	१०,०००/-
५)	१	१०००० चौ.फुट ते २०००० चौ.फुट च्या पुढे	३,५००/-	६,५००/-	१२,०००/-

तसेच वसई-विरार शहर महानगरपालिके मध्ये प्रभाग समिती स्तरावर नोंदणीकृत आस्थापना आहेत. त्यांचे परवाना फी व नुतनीकरण फी प्रशासकीय ठराव क्र. ३४२, दि.०८/०१/२०२१ च्या अनुषंगाने दर निश्चित केलेले आहेत त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

तक्ता क्र. ३

परवाना फी / नुतनीकरण फी सध्याचे प्रचलित दर

अ.क्र.	क्षेत्रफळ	दर (रू. मध्ये)
१)	१ ते १०० चौ.फुटापर्यंत	७,५०/-
२)	१०१ ते २५० चौ.फुटापर्यंत	१,५००/-
३)	२५१ ते ५०० चौ.फुटापर्यंत	२,५००/-
४)	५०१ ते १००० चौ.फुटापर्यंत	३,५००/-
५)	१००१ ते २५०० चौ.फुटापर्यंत	५,०००/-
६)	२५०१ ते ३५०० चौ.फुटापर्यंत	६,०००/-
७)	३५०१ ते ५००० चौ.फुटापर्यंत	७,०००/-
८)	५००१ ते ६५०० चौ.फुटापर्यंत	८,०००/-
९)	६५०१ ते ८००० चौ.फुटापर्यंत	१०,०००/-
१०)	८००१ ते १०,००० चौ.फुटापर्यंत	१५,०००/-
११)	१०,००० चौ.फुटापर्यंत	२०,०००/-

तक्ता क्र. ४

३ वर्षाच्या कालावधीतील प्रति वर्ष १०% प्रमाणे प्रस्तावित दर

अ.क्र.	क्षेत्रफळ	दर (रू. मध्ये)
१)	१ ते १०० चौ.फुटापर्यंत	१,०००/-
२)	१०१ ते २५० चौ.फुटापर्यंत	२,०००/-
३)	२५१ ते ५०० चौ.फुटापर्यंत	३,४००/-
४)	५०१ ते १००० चौ.फुटापर्यंत	४,७००/-
५)	१००१ ते २५०० चौ.फुटापर्यंत	६,७००/-
६)	२५०१ ते ३५०० चौ.फुटापर्यंत	८,०००/-
७)	३५०१ ते ५००० चौ.फुटापर्यंत	९,५००/-
८)	५००१ ते ६५०० चौ.फुटापर्यंत	१०,७००/-
९)	६५०१ ते ८००० चौ.फुटापर्यंत	१३,५००/-
१०)	८००१ ते १०,००० चौ.फुटापर्यंत	२०,०००/-
११)	१०,००० चौ.फुटापर्यंत	२७,०००/-

सदरचे दर निश्चित करण्याबाबत महानगरपालिकांच्या परवाना फी दरांचा तुलनात्मक अभ्यास करून सुधारित परवाना फी / नुतनीकरण फी प्रस्तावित करणेबाबत प्रशासकीय ठराव क्र. ३४२, दि.०८/०१/२०२१ नंतर परवाना फी मध्ये कोणतीही वाढ ने केल्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पनात ज्या प्रमाणे भर पडणे आवश्यक आहे.

तसेच परवानाधारकाने नाहरकत दाखला, नुतनीकरण फी मुदत संपण्याच्या ३० दिवसा आधी नुतनीकरण करण्यात येऊन अद्यावत करणे बंधनकारक आहे, तसे न केल्यास सदर व्यवसाय परवानाधारक यांना विलंब शुल्क आकारण्यात येईल. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. ५

विलंब आकार फी

अ.क्र.	कालावधी	परवाना फी च्या (टक्केवारी)
१)	१ ते ३ महिने	१०%
२)	४ ते ६ महिने	२०%
३)	७ ते ९ महिने	३०%
४)	९ ते १२ महिने	४०%
५)	पुढील प्रत्येक ३ महिन्यानंतर	१०%

त्याअनुषंगाने, तक्ता क्र. २ व तक्ता क्र. ४ नुसार वसई-विरार महानगरपालिकेची मैदाने, कला-क्रिडा समारंभासाठी, धार्मिक कार्यासाठी व निवडणूकीच्या कामासाठी, वैयक्तीक मालकीच्या जागा जत्रा उत्सव व विविध समारंभासाठी भाडे तत्वावर देणेबाबत तसेच व्यवसाय परवाना, ना-हरकत दाखला, नूतनीकरण फी, साठा परवाना, नवीन दर निश्चीत करणेबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत मजूरीस्तव सविनय सादर.

<u>ठराव निर्णय</u> :-

सदर महानगरपालिकेची मैदाने, कला-क्रिडा समारंभासाठी व धार्मिक कार्यासाठी, निवडणूकीच्या कामासाठी, वैयक्तीक मालकीच्या जागा, जत्रा उत्सव व विविध समारंभासाठी भाडे तत्वावर देणेबाबत तसेच व्यवसाय परवाना, ना-हरकत दाखला, नूतनीकरण फी, साठा परवाना, नवीन दर निश्चीत करणेसाठी मान्यता देण्यात येईल.

सदरची अंमलबजावणी ठरावाच्या दिनांकापासून करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार प, जि- पालघर, पि नं. ४०१३०३
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - १८२८

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- १२/१२/२०२५

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या कामकाजाकरीता संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर व इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती, ७ रुग्णालये, २१ नागरी आरोग्य केंद्र, माताबाल संगोपन केंद्र व ७ अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. सदर कार्यालया अंतर्गत विविध दैनंदिन कामकाज व ऑनलाईन कामकाज संगणकामार्फत करण्यात येते. सद्यस्थितीत महापालिकेतील मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती व इतर कार्यालयाअंतर्गत एकुण ६०४ संगणक संच व ४१७ प्रिंटर कार्यरत आहेत. (विभाग निहाय कार्यरत साहित्यांचा तपशिल पृष्ठ क्र. वर जोडला आहे.) परंतू सदर संगणक व प्रिंटर पैकी बरेचसे संगणक व प्रिंटर हे वॉरंटी बाहेर गेलेले असून ७-८ वर्षापेक्षा अधिक वर्ष झालेली आहेत. तसेच वारंवार देखभाल दुरुस्ती करुन देखील संगणक व प्रिंटर नादुरुस्त होत आहेत.

महापालिकेतील कार्यालया अंतर्गत पुरविण्यात आलेले संगणक संच, प्रिंटर, नादुरुस्त झाल्यास अथवा विभागात नव्याने संगणक संच, प्रिंटर स्कॅनर व इतर अनुषंगिक साहित्यांची आवश्यकता असल्यास सदर विभागामार्फत माहिती तंत्रज्ञान विभागात मागणी देण्यात येते. (विभागांची प्राप्त माहिती पृष्ठ क्र ते पृष्ठ क्र . वर जोडण्यात आलेली आहे.) तसेच ७-८ वर्षे झालेले संगणक, प्रिंटर व इतर अनुषंगिक साहित्य दुरुस्त न करता सदर सहित्य निर्लेखित करुन व्हिलेवाट लावणे उचित राहील व त्याऐवजी संबधित विभागाला नविन साहित्य देणे आवश्यक आहे. (७-८ वर्षे झालेल्या सहित्यांची यादी सोबत जोडत आहे.)

वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह ९ प्रभाग समिती, ७ रुग्णालये, २१ नागरी आरोग्य केंद्र व ७ अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालयांच्या मागणी नुसार व ७-८ वर्षेपासून साहित्य नव्याने ऐवजी संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर व इतर अनुषंगिक साहित्याचा तपशिल व GEM पोर्टलवर निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणेकामी होणाऱ्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

Sr. No.		Item Description	Quantity	Rate	Total	Rate refernce
1	Desktop (i3)	Small form factor Processor -12th Gen Intel® Core™ i3-12100 or above, OS - Windows 11 Pro, MS office, 21.5 inch monitor Graphics - Intel® UHD Graphics 730, 802.11ac 1x1 WiFi and Bluetooth Memory - 16 GB, DDR4, 3200 MHz Storage - 512 GB, M.2 PCIe NVMe, SSD, 3 years on-site warranty, With MS office latest and Anti Virus 3 yrs	150	67950	10192500	GEM

2	Desktop (AIO) (i5)	Processor -12th Gen Intel® Core™ i5-1235U, OS - Windows 11 Home Single Language, MS office, Graphics - Intel® UHD Graphics Memory - 8GB, 1x8GB, DDR4, 3200MHz, Storage - 512 GB, M.2, PCIe NVMe, SSD, Display - 60.5-cm. display Full HD (1920X1080) 3 years on-site warranty, With MS office latest and Anti Virus 3 yrs	5	79000	395000	GEM
3	Laptop	12th Generation Intel® Core™ i5 processor, Windows 11 Home, MS office, 39.6 cm (15.6) diagonal FHD display, Intel® Iris® Xᵉ Graphics, 512 GB PCIe® NVMe™ M.2 SSD, 8 GB DDR4-3200 MHz RAM (2 x 4 GB) 1.74 kg, 3 years on-site warranty, and Anti Virus 3 yrs	2	58750	117500	GEM
4	Laptop (high end)	Processor -12th Gen Intel® Core™ i7-12700H, OS - Windows 11 Home Single Language, MS office latest, Graphics - NVIDIA® GeForce RTX™ 3060, 6 GB GDDR6, 60 W, Memory - 16 GB, 2 x 8 GB, DDR5, 4800 MHz, dual-channel, Storage - 1 TB, M.2, PCIe NVMe, SSD, Display - 40.6-cm. display 3K (3072X1920), 3 years on-site warranty	2	134500	269000	GEM
5	Monocrome printer	A4 Black and White Laser Jet Printer, Copy/Print speed: 18 / 22 Prints Per Minute, Print Size: A4, FS & Lgl by Cassette , Paper Capacity: 300 Sheets 1 Cassette Interface usb, 3 years on-site warranty	70	14395	1007650	GEM
6	Color printer	A4 Color Inkjet All-in-One Printer, Print, Scan, Copy, ADF, Wireless Print speed up to 23 ppm (black) and 22 ppm (color), USB, WiFi, Bluetooth, LAN, Mobile Printing, 3 years on-site warranty	10	26000	260000	GEM
7	Scanner	Sheetfed Up to 600 dpi , Up to 40 ppm/80 ipm, USB 3.0 , Recommended daily duty cycle: 4000 pages, 3 years on-site warranty	50	45453	2272650	GEM
8	Projector	3800 Lumens, 22000: 1 Contrast Auto Vertical Keystone for Perfect Alignment, Lamp Life up to 30,000 hrs, Full HD 1080p, Connector Type-VGA, HDMI, Miracast, 3 years on-site warranty	1	70000	70000	GEM
9	Projector screen	120" Inch Projector Screen with Stand 16:9, Tripod Screen (Size :- 8 ft.(W) x 6 ft.(H) - 120" Inch)	1	20000	20000	GEM
10	Keyboard	DEVICE TYPE: Keyboard CONNECTIVITY TECHNOLOGY: Wired INTERFACE: USB HOT KEYS FUNCTION: Volume, Mute, Play/Pause, Backward, Forward KEYS STYLE: Chiclet, 3 years on-site warranty	10	660	6600	GEM

11	Mouse	Movement Detection: Optical, Resolution : 1000dpi;, Cable Length : 1.8 meter, Interface Type : USB Weight : 413 Grams Warranty : 3 Years	10	460	4600	GEM
12	Pendrive	Memory Storage Capacity 64 GB Hardware Interface USB, USB 3.2 Gen 1	10	1099	10990	GEM
13	Pendrive	Memory Storage Capacity 128 GB Hardware Interface USB, USB 3.2 Gen 1	10	1199	11990	GEM
14	Portable SSD	Digital Storage Capacity 2 TB Hard Disk Interface PCIE x 4 Connectivity Technology USB Hard Disk Description Solid State Hard Drive, Feature IP55, 5 Year Warranty,	2	15750	31500	GEM
15	Portable SSD	Digital Storage Capacity 1 TB Hard Disk Interface PCIE x 4 Connectivity Technology USB Hard Disk Description Solid State Hard Drive, Feature IP55, 5 Year Warranty,	5	9899	49495	GEM
16	Spike guard	4+4 Power Strip with Spike Guard & Surge Protector, , 4 Individual Power Switch, Power Indicator, 6 AMP Output, Safety Shutter, , 4 International Sockets Extension Board, 2 Meter Cord Length	20	2180	43600	GEM
17	Router	1200Mbps, Wi-Fi Speed Up to 867 Mbps/5 GHz + , 400 Mbps/2.4 GHz, 5 Gigabit Ports, 4 External Antennas, MU-MIMO, Dual Band.	5	2699	13495	Market
18	TV	Screen Size 43 Inches Display Technology LED Resolution 4K, Refresh Rate 60 Hz Connector Type Wi-Fi, USB, Ethernet, HDMI	3	39995	119985	GEM
19	Cat-6 cable	Category : 6 UTP Solid cable (305 meter), Conductor : Conductor : 23 AWG (Solid) , Conductor Meta : Conductor Meta : Bare Copper Insulation Material : HD-PE OD : 6.1mm ±0.2 Resistance Unbalance : 5% Max Capacitance Unbalance : 330pF/100m Delay Skew : <45nS	2	9599	19198	Market
20	Tools	Crimping tool Plug RJ-45 / RJ-12 / RJ -11 types of connections, key ways in 8P, 6P and 4P modular holders	2	1794	3588	GEM
21	Tools	Cable LAN tester RJ45 & RJ11 Jack Connector line	1	2360	2360	GEM
22	Connectors	Connector Type RJ45 Cable Type CAT6 Compatible Device Server, Router Colour WHITE (100 per box)	1	499	499	Market
23	Batteries	Alkaline Battery AAA - 20 Pieces	10	789	7890	Market
24	Batteries	Alkaline Battery AA - 20 Pieces	10	850	8500	Market

25	UPS	Interactive UPS with Load Capacity of 360Watts / 600VA. Output Frequency : 47 - 63 Hz Sync to main, Upto 15-20 min. Power Backup, 3 years on-site warranty	150	2595	389250	GEM
26	Voice recorder	voice recorder Battery Life : Up-to 12hours of battery life , Built-In Memory : Up to 16GB of built-in storage, expandable via microSD (SDHC/SDXC) cards Usuage : Record in MP3/LPCM with a high sensitivity S-Microphone USB Type-C connectivity, cable supplied (USB-A to USB-C)	4	11599	46396	Market
27	Monitor (21.5)	Screen Size - 21.5 Inches Display Resolution Maximum - 1920 x 1080 Pixels, Special Feature Energy Star, Refresh Rate 75 Ports: 1 VGA; 1 HDMI, 3 years on-site warranty	10	6599	65990	Market
28	Wifi adapter	USB Wi-Fi Adapter 600Mbps 2.4G/5G Dual Band Advanced Security-Supports 64/128-bit WEP, , WPA/WPA2, and WPA-PSK/WPA2-PSK Operating System- Windows 11/10/8.1/8/7/XP, , Mac OS 10.15 and earlier	5	649	3245	Market
29	Speaker portable	Wireless Bluetooth speaker with microphone Up to 20 hours of playtime IPX7 waterproof, 3.5 mm audio cable Input	2	70000	140000	Market
30	USB hub	USB C Hub 7-in-1 USB C ,with 4K 60Hz HDMI, 1Gbps RJ45 Ethernet, 100W Power Delivery, SD/TF Card, USB 3.0 5Gbps Data, Compatible with all devices	2	2389	4778	Market
31	Usb to LAN	USB to Ethernet Converter Adapter Supports 10/100/1000 Mbps Auto Sensing Capability Half/Full Duplex Operation Compliant with the Standard Specification of USB 1.1,2.0 and 3.0 Supports Full duplex flow control (IEEE 802.3x)	5	1049	5245	Market
32	Tab(high end)	M3 Chip 28.22 cm (11″), Wi-Fi + Cellular, 256GB) with pencil & keyboard	2	119700	239400	
				Total	**15832894**	

उपरोक्त तक्त्यातील नमुद साहित्य कार्यालयीन कामकाजासाठी खरेदी करणेकामी सन २०२५-२६ करीता अंदाजित रक्कम रु. १,५८,३२,८९४/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र. ०४१-४१७२-१ "संगणकीय साहित्य खरेदी" अंतर्गत भागवता येईल.

तरी वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह प्रभाग समिती, रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्र, अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालयात होणा-या दैनंदिन कामकाजाकरीता मागणीनुसार व ७-८ वर्षे जुने साहित्य ऐवजी नव्याने सहित्य देणेकामी संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर व इतर अनुषंगीक साहित्य खरेदीकामी GEM पोर्टलवर ई-निविदा प्रक्रिया राबवून एजन्सी खरेदी करणेकामी व होणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १,५८,३२,८९४/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेस्तव सादर.

ठराव/निर्णय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह प्रभाग समिती, रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्र, अग्निशमन केंद्र व इतर विभागीय कार्यालयात होणा-या दैनंदिन कामकाजाकरीता मागणीनुसार व ७-८ वर्षे जुने साहित्य ऐवजी नव्याने सहित्य देणेकामी संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर व इतर अनुषंगीक साहित्य खरेदीकामी GEM पोर्टलवर ई-निविदा प्रक्रिया राबवून एजन्सी खरेदी करणेकामी व होणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १,५८,३२,८९४/-इतक्या खर्चास इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि.- पालघर, पिन नं. 401 303
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १८२९ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १२/१२/२०२५

विषय :- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत कार्यान्वित करण्यात आलेल्या व प्रस्तावित असणा-या आयुष्मान आरोग्य मंदीर व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना करीता सन २०२५-२०२६, २०२६-२०२७, २०२७-२०२८ साठी परिचर (Attendant) व स्वच्छता कर्मचारी या पदाची भरती बाहयस्त्रोत बाहयस्त्रोत पध्द्तीने भरणेच्या ई-निविदा क्र. **2025 VVCMC 1224702 1** च्या निवड झालेल्या निविदा धारकास पुरवठा कार्यादेश देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत महानगरपालिकेच्या स्तरावर राज्य शासन व केंद्र शासनाने शहरांर्गत ६५ आयुष्मान आरोग्य मंदीर व १५ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करण्याचे उदिष्टये दिलेले आहे. त्यापैकी सद्यस्थितीत ३४ आयुष्मान आरोग्य मंदीर व १५ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. सदर आरोग्य केंद्रामध्ये कामकाज करणेकरिता प्रत्येकी एक परिचर (Attendant) व एक स्वच्छता कर्मचारी बाहयसंस्थेमार्फत नियुक्त करावयाचे आदेश आहेत. सद्यस्थितीत मे. गजानन फॅसिलिटीज प्रायव्हेट लिमिटेड, बोईसर हे बाहय यंत्रणेव्दारे परिचर (Attendant) व स्वच्छता कर्मचारी पुरवठा करीत आहेत. परंतु त्यांचा पुरवठा आदेश संपुष्टात येत असल्याने सदरचे परिचर (Attendant) व स्वच्छता कर्मचारी पुरवठा करणेकामी नवीन निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असल्याने या प्रमाणे एकुण ८० परिचर (Attendant) व ८० स्वच्छता कर्मचारी यांची आवश्यकता असल्याने त्याकरिता संदर्भ क्र. ०३ नुसार ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा क्र. ०१ दिनांक २९/१०/२०२५ रोजी उघडण्यात आला असता एकूण ०७ निविदाधारकाने भाग घेतलेला होता. त्यामध्ये ६ निविदाधारक पात्र होऊन त्यांचा दरांचा लिफाफा क्र. ०२ दिनांक १८/११/२०२५ रोजी उघडण्यात आला. त्याबाबतचा तपशील पुढिलप्रमाणे:-

अ.क्र.	प्राप्त दर	PNS UPKEEP Services PVT. LTD.	Gadagebaba Maharaj ijgar Santha	Disha Agency	Shivam nterprises And rsonnel Services PVT. LTD.	EMKAY ilities Services rivate Limited	Ujala Labour Contractor
१.	परिचर	७६४	१५५	१५५००	१५५००	१५५००	३३०००
२.	स्वच्छता कर्मचारी	७६४	१५५	१५५००	१५५००	१५५००	३३०००

उक्त नमूद दरांच्या लिफाफामध्ये १) मे. दिशा एजन्सी २) शिवम इंटरप्रायझेस ॲंड पर्सोनल सर्विसेस प्रा.लि., ३) ईएमकेएव्हाय फॅसिलिटीज प्रा.लि. हया तिन्ही निविदाधारकांचे दर हे समान आलेले आहेत.

परंतू मे. दिशा एजन्सी पुणे व ईएमकेएव्हाय फॅसिलिटीज प्रा.लि. यांनी माघार घेतली असून मे. शिवम इंटरप्रायझेस ॲंड पर्सोनल सर्विसेस प्रा.लि. यांना सदर निविदेचे काम करणेस देण्यास हरकत नसल्याचे दर्शविलेले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या आयुष्मान आरोग्य मंदीर व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना करीता परिचर (Attendant) व स्वच्छता कर्मचारी पुरवठा कामाची सन २०२५-२०२६, २०२६-२०२७, २०२७-२०२८ साठी ई-निविदा मागविण्यात आलेली होती. त्यामध्ये १) मे. दिशा एजन्सी २) शिवम इंटरप्रायझेस ॲंड पर्सोनल सर्विसेस प्रा.लि., ३) ईएमकेएव्हाय फॅसिलिटीज प्रा.लि. हयांचे सामान दर आलेले होते. परंतू मे. दिशा एजन्सी पुणे व ईएमकेएव्हाय फॅसिलिटीज प्रा.लि. यांनी माघार घेतली असल्याने मे. शिवम इंटरप्रायझेस ॲंड पर्सोनल सर्विसेस प्रा.लि. यांना कार्याक्षेत्रात सुरु झालेल्या व भविष्यात सुरु होणाऱ्या आयुष्मान आरोग्य मंदीर व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या ठिकाणी सदर ८० परिचर व ८० स्वच्छता कर्मचारी पुरवठा करणेकामी राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचेकडून मिळणाऱ्या PIP मंजुरीस अधिन राहून पुरवठा कार्यदेश देणेस मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प), जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०३

दुरध्वनी- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. १९३०

विभाग :- विदयुत विभाग

दिनांक :- १२/१२/2025

<u>प्रस्तावाचा विषय</u>:- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.4, 13, 15, 29, 32, 33, 34, 35 व 36 मध्ये विविध ठिकाणी सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेंबाबत...

<u>प्रस्तावाचा मजकुर :-</u>

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 33,76,800/- (PWD -CSR 2023-24)

2. कामाची आवश्यकता :- महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक रस्त्यावर, उदयान, तलाव, मैदान, स्मशानभुमी येथील सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था यासोबत कार्यालयीन व बहुद्देशिय इमारती, रुग्णालये व आरोग्य केंद्र, समाजमंदिर व मार्केट इ. मधिल वीज संच मांडणी व त्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती विद्युत विभागामार्फत करणेंत येते.

   दि.26/05/2025 रोजी प्रभाग समिती (ए), बोळींज कार्यक्षेत्रातील माजी सदस्य यांनी मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांची भेट घेतली.

   सदर भेटी दरम्यान प्रभाग समिती (ए), बोळींज कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.4, 13, 15, 29, 32, 33, 34, 35 व 36 मधिल विविध ठिकाणी नविन सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणेंची मागणी करणेंत आली.

   त्यानुसार, सदर प्रभागात नविन दिवाबत्ती व्यवस्था करणेंकरिता सन्मा.माजी सदस्यांसोबत पाहणी करणेंत आली असुन, आवश्यक ठिकाणी नव्याने दिवाबत्ती उभारणी कामाचे अंदाजपत्रक तयार करणेंत आले आहे.

   सदर कामाकरिता शासन दरसुचीनुसार रक्कम 33,76,800/- रुपये खर्च अपेक्षित राहणार आहे.

3. जागेची मालकी :- महानगरपालिका सार्वजनिक रस्ते

4. कामाचे स्वरुप :- 6 मी पाईप पोल- 131 नग, 70-75 वॅट LED फिटींग- 131 नग, 3x2.5sq.mm मेन्स वायर- 786 मी, 4x6sq.mm आर्मड केबल- 3930 मी, अर्थिंग -131 नग

तरी, प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.4, 13, 15, 29, 32, 33, 34, 35 व 36 मध्ये विविध ठिकाणी नविन पोल उभारुन सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी होणारा रक्कम 33,76,800/- रुपये खर्च सन 2025-26 या वित्तीय वर्षातील विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे / भुमीगत केबल व्यवस्था / टायमर व्यवस्था या लेखाशिर्षकातील रक्कम 25 कोटी रुपये तरतुदीमधुन भागविण्यात येईल.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार सदरचा प्रस्ताव प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.4, 13, 15, 29, 32, 33, 34, 35 व 36 मध्ये विविध ठिकाणी सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणेंकामी येणाऱ्या रक्कम 33,76,800/- रुपये इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १८३१ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १२/१२/ २०२५

कामाचे नाव :- वसई विरार शहर महानगरपालिका सुर्या टप्पा १ व २ अंतर्गत काशिदकोपर येथील जलवाहिनीवर Poly Ironite Ceramic Cementing (PICC) Coating करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

लेखाशिर्ष :- "विकास निधी अंतर्गत सुर्या योजना भांडवली कामे"

योजनेचे नाव :- सुर्या योजना

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ५०,८४,६३७/- (GST सह)

तांत्रिक मान्यता रक्कम :- रु. ५०,८४,६३७/-

निविदा रक्कम :- रु. ४३,०९,०१४/- (GST वगळुन)

प्रशासकीय मान्यता आदेश / ठराव क्र. ३००, दिनांक :- २०/०५/२०२५

प्रशासकीय मान्यतेची रक्कम :- रु. ५०,८४,६३७/- (GST सह)

तांत्रिक मान्यता क्र. W/S २०२५-२६ दि.:- २०/०५/२०२५

ई - निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक : - ३०/०५/२०२५

वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक :- ०२/०६/२०२५, कालावधी – ०८ दिवस

वृत्तपत्रांची नावे : - १) दै. महाराष्ट्र टाईम्स २) दै. पुढारी ३) दै. खबरे आजतक ४) दै. चौफेर संघर्ष

ई-निविदा प्रसिध्दी :- दि. ०२/०६/२०२५ वेळ ३.०० पासून ते दि. १०/०६/२०२५ वेळ. ३.०१ पर्यंत

ई - निविदाव्दारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या :- ०३

प्रथम लिफाफा उघडल्याची दिनांक :- दि. ०९/०६/२०२५

पात्र निविदा संख्या :- ०३

व्दितीय लिफाफा उघडल्याची दिनांक :- दि. ०३/११/२०२५

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- प्र. कार्यकारी अभियंता

प्राप्त लघूत्तम दर :- अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (-) ०.५०% कमी दराने

वित्तीय मान्यता :- रु. ५०,५९,२१४/-

प्राप्त दर

अ. क्र.	निविदाकार	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटी बाबत धनाकर्ष तपशील	एल १, एल २, एल ३ इत्यादी नुसार क्रम निश्चित करून नोंदवावा	एल १ चा तपशील
१	मे. नर्मदा स्प्रेडींग स्किल्स प्रा. लि.	(-) ०.५०% कमी दराने	पावती क्र. १८५२४० दि. ०७/११/२०२५ (पृ. क्र. २०७)	एल १ (पृ. क्र. १९९)	(-) ०.५०% कमी दराने
२	मे. जय नारायण सिंग	(+) ३.००% जादा दराने	-	एल २ (पृ. क्र. २०१)	-
३	मे. सोनादेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादीत	(+) ५.००% जादा दराने	-	एल ३ (पृ. क्र. २०३)	-

उपरोक्त निविदाकार यांनी सादर केलेल्या दराचा विचार करता लघूत्तम दर (एल - १) मे. नर्मदा स्प्रेडींग स्किल्स प्रा. लि., हे निविदाधारक ठरत असून त्यांनी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (-) ०.५०% कमी दराने नमूद केलेले दर योग्य व वाजवी वाटत आहेत. तसेच सदर कामी (एल - १) निविदाधारक मे. नर्मदा स्प्रेडींग स्किल्स प्रा. लि., यांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (-) ०.५०% कमी दरास मा. निविदा समितीने दि. १७/ ११/२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी विषयांकीत कामी एल - १ निविदाधारक मे. नर्मदा स्प्रेडींग स्किल्स प्रा. लि., यांच्या समवेत अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (-) ०.५०% कमी दराने संविदा करण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या रक्कम रु.५०,५९,२१४/- खर्चास वित्तीय मान्यतेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- १) वसई विरार शहर महानगरपालिका सुर्या टप्पा १ व २ अंतर्गत काशिदकोपर येथील जलवाहिनीवर Poly Ironite Ceramic Cementing (PICC) Coating करणे कामी मे. नर्मदा स्प्रेडिंग स्किल्स प्रा. लि. यांच्या समवेत अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (-) ०.५०% कमी दराने संविदा करण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या रक्कम रु.५०,५९,२१४/- खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर कामी आवश्यक बाबींची पुर्तता करुन मे. नर्मदा स्प्रेडिंग स्किल्स प्रा. लि. यांस समवेत संविदा करण्यास मंजूरी देण्यांत येत असे.

३) विषयांकीत कामी उर्वरीत अन्य ठेकेदारांच्या इसारा रक्कम परत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - 1632 विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - 12/12/2024

प्रस्तवाचा विषय :- प्रभाग समिती बी तुळींज दत्त मंदिर इच्छापुर्ती सोसायटी समोर ४०० मी.मी, व ३५० मी.मी. व्यासाची मुख्य व वितरण जलवाहिनी वरील असलेल्या वॉलचे आर.सी.सी. चेंबर दुरूस्ती करून नव्याने एम.एस. कव्हर बसविणे कामी प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजूर करून संविदा करणेस मान्यता मिळणे बाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३,३८,९१८/-

प्रशासकिय मंजूरी ठराव व दिनांक :- प्रशासकिय ठराव.क्र.१५९० दि.१३/११/२०२५

तांत्रीक मान्यता मा.कार्यकारी अभियंता यांचेकडील रजि.क्र.W.S., पृष्ठ क्र.०५/३०, दि. ०२/१२/२०२५

तांत्रीक मान्यता रक्कम रु.३,३८,९१८/-

निविदा प्रसिध्दीची तारीख :- दि. २४/११/२०२५

वृत्तपत्राचे नाव व नोटीस बोर्डावर निविदा प्रसिध्दीची तारीख :- दै. वृत्तमानस, दै.स्टँडर्ड पोस्ट, दै. आमची मुंबई मध्ये दि.२४/११/२०२४

निविदा स्वीकारल्याचा दिनांक :- दि. ०२/१२/२०२५, दु.४.०० वाजेपर्यंत

निविदा उघडल्याचा दिनांक :- दि. ०२/१२/२०२५

प्राप्त निविदांची संख्या :- ३

प्राप्त ई-निविदाचे लखोटा क्र २ उघडल्या असता प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	तपशिल	ठेकेदाराने निविदेत भरलेले दर		
		मे. एम.बी.एम. कंस्ट्रक्शन, नालासोपारा	मे. बी. ई. गोरवे, नाशिक	मे. रिलायबल कंस्ट्रक्शन, नाशिक
१	प्रभाग समिती बी तुळींज दत्त मंदिर इच्छापुर्ती सोसायटी समोर ४०० मी.मी, व ३५० मी.मी. व्यासाची मुख्य व वितरण जलवाहिनी वरील असलेल्या वॉलचे आर.सी.सी. चेंबर दुरूस्ती करून नव्याने एम.एस. कव्हर बसविणे	०.००% अंदाजपत्रकीय दराने	१.५०% जादा दराने	१.००% जादा दराने

सदर कामी संविदा मंजूरी प्राप्त करणे, लघुत्तम निविदाधारका सोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पूर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमूद कालमर्यादेत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अ. क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव	प्रशासकिय ठराव.क्र.१५९० दि.१३/११/२०२५
२	कार्यकारी तथा शहर अभियंता ह्यांची तांत्रीक मान्यता प्राप्त	दि.१९/११/२०२५
३	निविदा प्रसिध्द करणे	दि.२४/११/२०२५
४	प्रथम लिफाफा उघडणे	दि.०२/१२/२०२५
५	द्वितीय लिफाफा उघडणे	दि.०२/१२/२०२५
६	संविदा मंजूरी ठराव	दि.०८/१२/२०२५
७	कार्यादेश देणे / करारनामा करणे	दि.१०/१२/२०२५
८	काम सूरू करणे	दि.१०/१२/२०२५
९	काम पूर्ण करणे	दि.२४/१२/२०२५
१०	देयक सादर करणे	दि.३०/१२/२०२५
११	देयकाचे प्रदान करणे	दि.०६/०१/२०२६

उपरोक्त निविदा धारकांनी निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे. एम.बी.एम. कंस्ट्रक्शन, नालासोपारा** यांच्या निविदेमधील अंदाजपत्रकीय रक्कमेच्या तुलनात्मकरित्या प्राप्त दर इतर निविदेमधील दराच्या तुलनेत कमी आहे. याबाबत दि. ०२/१२/२०२५ रोजी निविदा समितीने मंजुरीस शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९४९ कलम ७३क / ७३ड नुसार **मे. एम.बी.एम. कंस्ट्रक्शन, नालासोपारा** यांची सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजूरी करून संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांचे मंजुरीसाठी सविनय सादर.

ठराव - सदर कामाकरीता खालील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रीक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेणे बंधनकारक असेल.

याकामी खालील विहित करून देण्यात आलेल्या कालावधीत काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची असेल.

अ. क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव	प्रशासकिय ठराव.क्र.१५९० दि.१३/११/२०२५
२	कार्यकारी तथा शहर अभियंता ह्यांची तांत्रीक मान्यता प्राप्त	दि.१९/११/२०२५
३	निविदा प्रसिध्द करणे	दि.२४/११/२०२५
४	प्रथम लिफाफा उघडणे	दि.०२/१२/२०२५
५	द्वितीय लिफाफा उघडणे	दि.०२/१२/२०२५
६	संविदा मंजूरी ठराव	दि.०८/१२/२०२५
७	कार्यादेश देणे / करारनामा करणे	दि.१०/१२/२०२५
८	काम सूरू करणे	दि.१०/१२/२०२५
९	काम पूर्ण करणे	दि.२४/१२/२०२५
१०	देयक सादर करणे	दि.३०/१२/२०२५
११	देयकाचे प्रदान करणे	दि.०६/०१/२०२६

तरी वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती बी तुळींज दत्त मंदिर इच्छापुर्ती सोसायटी समोर ४०० मी.मी, व ३५० मी.मी. व्यासाची मुख्य व वितरण जलवाहिनी वरील असलेल्या वॉलचे आर.सी.सी. चेंबर दुरूस्ती करून नव्याने एम.एस. कव्हर बसविणे कामी निविदे अंतर्गत प्राप्त दरांपैकी मे. एम.बी.एम. कंस्ट्रक्शन, नालासोपारा यांचे निविदेतील दर अंदापत्रकीय रक्कमेची असून सर्वात कमी दराची आहे. तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडील जा.क्र. वविशम/लेखा/७७/२०२५-२६ दि.०४/०८/२०२५ रोजी मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांस सदर निविदा मंजूर करणेस व संविदा करणे कामी करारनामा करून मंजूर ठेकेदार मे. एम.बी.एम. कंस्ट्रक्शन, नालासोपारा यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात येत आहे. तथापी अंदाजपत्रक मधील प्रत्येक टप्यावरील कामाचे Geo Tagged फोटाग्राफ्स सादर करणे आवश्यक राहील तदनंतरच कामाचे बील अदा करण्यात यावे.

उप-आयुक्त
परिमंडळ क्र. २
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०३
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.१९३३ विभाग : वैद्यकीय आरोग्य

दिनांक :१२/१२/२०२५

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात वैद्यकीय सेवा पुरविणेकामी दोन स्त्रीरोग तज्ञ यांना कंत्राटी पध्दतीने ३ महिनेकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेस व त्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत ७ रुग्णालये, २ माताबाल संगोपन केंद्रे, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, आयुष्मान आरोग्य मंदिर व हिंदहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यरत असून यामध्ये शहरातील नागरीकांना सेवा देण्यात येते. शासन निर्णय क्र.ववि‍म-१९११/प्र.क्र.६४९/नवि-२३, दि.०९ सप्टेंबर,२०१४ रोजीच्या वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारित आकृतीबंधामध्ये **वैद्यकीय अधिकारी "स्त्रीरोग तज्ञ"** संवर्गातील ०४ पदे मंजूर आहेत. तसेच सदर पदाची सेवाप्रवेश नियमात शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	सेवा व संवर्ग	पदनाम	नेमणूकीची पध्दत	नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा	नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती
१	श्रेणी-१ आरोग्य सेवा	स्त्रीरोग तज्ञ	नामनिर्देशन १००%	३५ वर्षे	अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी., (स्त्री व प्रसुतीरोग शास्त्र) किंवा एम.बी.बी.एस., डी.जी.ओ, समकक्ष पदवी. ब) शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात खालीलप्रमाणे व नमुद ठिकाणी वैद्यकीय अधिकारी "स्त्रीरोग तज्ञ" कार्यरत आहेत.

अ.क्र.	**कार्यरत डॉक्टरांचे नाव**	**कार्यरत ठिकाण**
१.	डॉ. राजेंद्र पिंगळे (६ महिने कंत्राटी)	माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र
२.	डॉ. कार्तिकभाई सावलिया (६ महिने कंत्राटी)	माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र
३.	डॉ. प्रेरणा पटेल / मोरे (६ महिने कंत्राटी)	माताबाल संगोपन केंद्र, सातिवली
४.	डॉ. मेघा दिलीपराव माने (६ महिने कंत्राटी)	माताबाल संगोपन केंद्र, सातिवली
५.	डॉ. वरुण विजय शिरिषकर (६ महिने कंत्राटी)	सर डी. एम. पेटीट रुग्णालय
६.	डॉ. साकेत हेमंत पाटील (६ महिने कंत्राटी)	सर डी. एम. पेटीट रुग्णालय
७.	डॉ. पल्लवी पिजुष सहा (६ महिने कंत्राटी)	बोळींज सामान्य रुग्णालय
८.	डॉ. सुवर्ण गिरीष अन्वेकर (६ महिने कंत्राटी)	बोळींज सामान्य रुग्णालय

माता बाल संगोपन केंद्र, सर्वोदय वसाहत यांनी दोन स्त्रीरोग तज्ञ मिळणेबाबत दि.२८/१०/२०२५ रोजी विनंती अर्ज केला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेचा आकृतीबंध सन २०१४ मध्ये मंजूर असून सदर आकृतीबंधात स्त्रीरोग तज्ञ यांची ४ पदे मंजूर आहेत. सदर आकृतीबंध मंजूर झाला त्या काळात फक्त दोन रुग्णालये कार्यरत होती. सद्यस्थितीत महानगरपालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या पाहता महानगरपालिकेच्या २०१४ नंतर नव्याने ५ रुग्णालये तसेच २ माताबाल संगोपन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. सदर ठिकाणी विविध आजारांवरील उपचारासाठी दररोज रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उपरोक्त् संदर्भानुसार वैद्यकीय अधिक्षक माता बाल संगोपन केंद्र सर्वोदय वसाहत यांनी दोन स्त्रीरोग तज्ञ मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे. सदर ठिकाणी नियुक्ती केलेले स्त्रीरोग तज्ञ डॉ. कुणाल पाटील (इमाव) व डॉ. सोनाली गायधनकर (अ.जा.) प्रवर्गातील असल्याने त्यांचे रिक्त राहिलेल्या प्रवर्गात तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने रिक्त पदांची पदभरती प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्र.ववि‍म-१९११/प्र.क्र.६४९/नवि-२३, दि.०९ सप्टेंबर,२०१४ रोजीचा आकृती बंध मंजूर असून सद्यस्थिती नव्याने आकृतीबंध शासनाकडे प्रस्तावित करणेची कार्यवाही सुरु आहे. त्यामध्ये एकुण स्त्रीरोग तज्ञ यांची २३ पदे मंजूरी करीता प्रस्तावित आहे.

सद्यस्थिती महानगरपालिकेच्या माताबाल संगोपन केंद्र, सर्वोदय वसाहत येथे तातडीने वरील स्त्रीरोग तज्ञ या संवर्गातील रिक्त प्रवर्गातील २ पदे यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) अन्वये ३ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने वृत्तपत्रात तसेच महानगरपालिका संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दी देऊन निवड समिती मार्फत पदभरती प्रक्रिया करणे आवश्यक आहे. तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.६,२८,७५८/- इतका खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या माताबाल संगोपन केंद्र, सर्वोदय वसाहत येथे दोन स्त्रीरोग तज्ञ या संवर्गातील रिक्त प्रवर्गातील २ पदे यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) अन्वये ३ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात करारनामा अटी-शर्तीच्या अधिन राहुन नेमणूक करण्यास व वृत्तपत्रात तसेच महानगरपालिका संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दी देऊन निवड समिती मार्फत पदभरती प्रक्रिया करणेस व याकामी त्यांचे मानधनापोटी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.६,२८,७५८/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३
दुरध्वनी- ०२५०-२५२५११/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १८३४ विभाग :- जाहिरात विभाग

दिनांक :- १२/१२/२०२५

विषय :- **वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जागेवर उभारणी करण्यात आलेल्या जाहिरात फलक (होर्डिंग्ज) व किऑस यांचे जाहिरात दर वाढविणे करीता प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.**

संदर्भ :- मा. आयुक्त तथा प्रशासक यांचा ठराव क्र. २१४० दि. ०९/११/२०२३ रोजीचा मंजुर ठराव

प्रस्तावित नाव :- वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जागेवर उभारणी करण्यात आलेल्या जाहिरात फलक (होर्डिंग्ज) व किऑस यांचे जाहिरात दर वाढविणे बाबत.

कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र. २१४० दि. ०९/११/२०२३ नुसार ठरलेल्या दरानुसार सन २०२४-२५ साठीची मागणी पुढील प्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक १

जाहिरातीचा प्रकार	मागणी (सन २०२४-२५)
